नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २२/०१/२०२६ (गुरूवार )

## उमरेड पोलीस स्टेशन हद्दीतील २ रेती तस्कर तसेच २ अवैध दारू च्या व्यवसायातील सराईत अशा ४ गुन्हेगारांना नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

**पोलीस स्टेशन उमरेड हद्द्दीतील अवैध रेती तस्कर तसेच अवैध दारू काढणारे /विक्री करणारे अशा एकुण ४ आरोपीतांना नागपुर ग्रामीण व जिल्हयातुन हद्दपार केले आहे.**

सराईत गुन्हेगार नामे **१) शेख गफ्फार इलाही शेख, वय. ५० वर्ष, रा. डिव्ही पब्लीक स्कुलजवळ, हसनबाग, नागपुर २) राहुल रमेश खैरवार, वय २८ वर्ष, रा. सेनापती नगर, दिघोरी घाट, उमरेड रोड, नागपुर** यांच्या वर अवैध रित्या विनापरवाना रेती चोरीचे गुन्हे नोंद आहे. नमुद आरोपी असे गुन्हे करण्याच्या सवयीचे असुन ते असे गुन्हे करून शासनाचा महसुल बुडवतात. तसेच आरोपी क्रं **३) आनंद अमृत पाटील, वय ५० वर्षे, रा बेसुर, ता. भिवापुर, जि. नागपुर आणि आरोपी क्रं ४) कमलाबाई सुरेश शिंदेकर, वय ६४ वर्षे, रा. इतवारी पेठ, उमरेड** यांचेवर अवैध दारू बाबत अनेक गुन्हे नोंद आहे. नमुद आरोपींच्या गुन्हेगारी कृत्यामुळे परीसारातील अनेकांना दारूचे व्यसन जडले आहे. पोलीसांनी आरोपीतांचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी कारवाई करून त्यांचेवर गुन्हे नोंद केले तसेच त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यांनी आपली गुन्हेगारी

गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद ४ गुन्हेगारांचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (ब) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव उमरेड पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, उमरेड यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून **वर नमुद आरोपी क्रं १,२ आणि ४ यांना ३ महीन्यांकरीता तसेच आरोपी क्रं ३ याला ४ महीन्यांकरीता नागपुर ग्रामीण व जिल्हयातुन हद्दपार केले आहे.**

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हा नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**



**शेख गफ्फार इलाही**



राहुल रमेश खैरवार



आनंद अमृत पाटील

# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद कन्हान पोलीस यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हान :—** दिनांक २२/०१/२०२६ रोजी कन्हान पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, बोरी सिंगोरी येथुन कन्हान कडे छोटा हाती गाडीमध्ये अवैधरित्या रेती ची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी बोरी पेट्रोलपंप जवळ नाकाबंदी केली असता टाटा एस वाहन क एम.एच. ४० सि.टी. ३८५९ मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली, त्यामध्ये रेती आढळुन आली. **आरोपी वाहन चालक मिलींद रनभिड लोंखाडे, वय ६२ वर्षे, रा. वार्ड क्र ०२ कांद्री कन्हान** हा मिळुन आला. त्याला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. **वाहन मालक** आरोपी क्रं **२) प्रदीप मोहळ, रा. क्रांदी, कन्हान** याच्या सांगणेवरून अवैधरित्या रेती वाहतुक करीत असल्याबाबत माहीती त्याने दिली.

पोलीसांनी पंचासमक्ष टाटा एस वाहन क एम.एच. ४० सि.टी. ३८५९ किमती २,५०,००० /—रूपये आणि १ ब्रास रेती किंमती २,५००/— रूपये आणि असा एकुण २,५२,५००/रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

नमुद आरोपी यांच्या विरूध्द पोस्टे कन्हान येथे कलम ३०३(२),४९, ३(५) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या २ आरोपीतां विरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हे नोंद

**पोलीस स्टेशन सावनेर :—** दिनांक २१/०१/२०२६ रोजी सावनेर पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी क्रं १ रामनारायन बदलुनाम कश्यप, वय ५७ वर्ष, रा. माईनर्स कॉर्टर, क्र १६ डब्लु.सी.एल सावनेर, हा माईनर्स कॉर्टर परीसरात अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. आरोपी क्रं २ श्रवन ऐकनंद दुबे, वय ३८ वर्ष रा.बजाज कॉलनी, कॉर्टर क्र ४/७ डब्लु.सी.एल सावनेर हा बजाज कॉलनी कॉर्टर, सावनेर परीसरात अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. **नमुद आरोपीतांवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये प्रत्येकी एक असे २ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने